पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दि.१३/८/२०१९

पुणे महानगरपालिका –सूचना कार्यपत्रिका क्र. ६ (पुरवणी)
ऑगस्ट २०१९

सोमवार, दि.१९/८/२०१९ रोजी दुपारी ३:००(तीन) वाजता भरणाऱ्या महानगरपालिकेच्या सभेपुढे ठेवण्यासाठी खाली निर्देश केलेल्या प्रस्तावांची सूचना (नोटीस) मा.सभासदांकडून आली आहे.

:– मा. सभासदांचा प्रस्ताव –:

विषय क्र.४२४

संदर्भ :– मा.श्रीनाथ भिमाले, सभागृहनेते,मा.राजेंद्र शिळीमकर व मा.दिपक पोटे यांची सूचना दि.७/८/२०१९

१) शहरी विकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासनचे क्र.पीएमसी-१०६९/१२२९२-सी दिनांक २०/१०/१९७० ची प्रारूप अधिसूचना

२) मा. महापालिका मुख्य सभा ठराव क्र.५ दिनांक ०३/०४/१९७०

३) मिळकत कर विभागाचे जा.क्र. टीजीओ/२४४० दिनांक २६/०७/२०१८ चे पत्र.

४) शासन निर्णय क्र.पीएमसी-३०१८/प्र.क्र.५९३/नवि-२२ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक २५/१०/२०१८

विषय– महापालिका मुख्य सभा ठराव क्र.५, दिनांक ०३/०४/१९७० अनुसार मिळकतकराची आकारणी करताना १०% ऐवजी १५% सूट देणे व घर मालक स्वतः राहत असलेल्या जागेचे भाडे वाजवी भाड्याच्या ६०% इतके धरावे हा ठराव शासनाकडून निलंबन/ विखंडनाबाबत.

-------

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे शेड्युल डी मधील प्रकरण आठ (कर नियम) चे नियम ७(१) नुसार, मिळकत करातून १०% वजावट देणे बाबत तरतूद आहे. तथापि, पुणे महानगरपालिकेमार्फत उपरोक्त संदर्भ क्र.१ चे प्रारूप अधिसूचनेनुसार, पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेमध्ये संदर्भ क्र.२ अन्वये ठराव संमत करणेत येवून, खालील बाबींस मान्यता देण्यात आलेली आहे.

1.करपात्र रक्कम ठरविताना १०% ऐवजी १५% सूट द्यावी.

२.घरमालक स्वतः राहत असलेल्या जागेचे भाडे वाजवी भाड्याच्या ६०% इतके धरावे.

तथापि, सदरील ठराव प्रारूप अधिसूचनेच्या आधारे झालेला असल्याने बेकायदेशीर असल्याने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन २०१०-११ ते २०१२-१३ स्थानिक संस्था लेखापरीक्षणाचे अहवालात परिच्छेद ४.९ काढण्यात आला. सदरील परिच्छेद लोकलेखा समितीमध्ये चर्चेस्तव निवडण्यात येवून, सदरील परिच्छेदावर दिनांक २६/०६/२०१८ रोजी झालेल्या लोकलेखा समितीचे बैठकीमध्ये चर्चा होवून, शासन निर्णय क्र.पीएमसी-३०१८ प्र.क्र.५९३/नवि-२२, मंत्रालय, मुंबई दिनांक २५/१०/२०१८ अनुसार महानगरपालिके मार्फत मालमत्ता कर देय असलेल्या कुठल्याही इमारतीचे किंवा जमिनीचे करपात्र मूल्य ठरविताना अशी जमीन किंवा इमारत ज्या अपेक्षित दराने भाड्याने दिली जाईल त्या वार्षिक दराच्या १०% प्रमाणे रक्कम एकूण करपात्र मुल्यातून वजा करण्याची तरतूद आहे. अधिनियमातील उपरोक्त तरतुद असली तरी दिनांक ०३/१२/१९६९ च्या प्रस्तावित प्रारूप अधिसूचनेच्या आधारे पुणे महानगरपालिकेने मुख्य सभा ठराव क्र.५, दिनांक ०३/०४/१९७० अन्वये करपात्र रक्कम ठरविताना १०% ऐवजी १५% सूट द्यावी, तसेच घरमालक स्वतः राहत आलेल्या जागेचे भाडे वाजवी भाड्याच्या ६०% इतके धरावे, असा निर्णय घेतला होता. व त्यानुसार पुणे महानगरपालिकेने कार्यवाही केलेली आहे. अधिनियमातील तरतुदीच्या विसंगत असे धोरण पुणे महानगरपालिकेने अवलंबिले असल्याने याबाबत महालेखापाल कार्यालयाने आक्षेप घेतले होते, पुणे महानगरपालिकेने केलेल्या उपरोक्त कार्यवाहीचे समर्थन करता येत नाही, याबाबत लोकलेखा समितीच्या साक्षीमध्ये झालेल्या चर्चेस अनुसरून तसेच आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी संदर्भाधीन पत्रान्वये कळविल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५१(१) नुसार पुणे महानगरपालिकेचा उपरोक्त ठराव क्र.५, दिनांक ०३/०४/१९७० निलंबित करण्यात आलेला असून, त्याबाबत संबंधिताना अभिवेदन करावयाचे असल्यास, या शासन निर्णयाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत शासनास सादर करावे. सदर कालावधीतील अभिवेदन प्राप्त न झाल्यास सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे कळविले आहे.

त्यानुसार मा. मुख्य सभा ठराव क्रमांक ११६६ दिनांक ०१/०३/२०१९ नुसार मालमत्ता कराची वार्षिक करपात्र रक्कम ठरविताना द्यावयाची १०% सवलत ही दिनांक ०१/०४/२०१९ पासून नवीन आकारणी करण्यात येणा-या मिळकतीबाबत करण्यात येत असल्याचे ठराव पारित करून शासनाकडे अभिवेदन करण्यात आले. त्यावर शासनाचे सम क्रमांकाचे पीएमसी-३०१५/प्र.क्र.६३९/नवि-२२ दिनांक २८/०५/२०१९ च्या पत्रान्वये खालील प्रमाणे आदेश देण्यात आलेले आहेत.

“महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार पुणे महानगरपालिके मार्फत १५% ऐवजी १०% रक्कम करपात्र मुल्यातून वजा करण्याची कार्यवाही महालेखापालांनी आक्षेप नोंदविल्यापासून म्हणजेच सन २०१०-११ या आर्थिक वर्षापासून करण्यात यावी. तसेच सन २०१०-११ या आर्थिक वर्षापासून १५% प्रमाणे ज्यादा अदा करण्यात आलेली रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच महालेखापालांच्या आक्षेपानंतर प्रस्तुत बाब शासनाच्या निदर्शनास आणून प्रस्ताव विखंडनासाठी पाठविणे आवश्यक होते. तथापि,असा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला नाही.त्यामुळे सदर अनियमिततेस जबाबदार असणा-या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील संबंधित अधिका-यांविरुद्ध ४ आठवड्यात आवश्यक अशी कारवाई करून त्याचा अहवाल शासनास सादर करावा”

वरील प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी सन २०१०-११ पासून सुमारे २.५ लक्ष पेक्षा जास्त मिळकतींची नोंदणी झालेली असून, या सर्व मिळकतींना सन २०१०-११ पासून ५% फरकाची रक्कम वसूल करण्यासाठी मागणी पाठविल्यानंतर सदर मिळकतधारकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण होणार आहे. त्याचप्रमाणे, या ८ ते ९ वर्षांच्या कालावधीमध्ये अनेक मिळकतींचे हस्तांतरण झालेले असते. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये देखील थकबाकीच्या दायित्वाबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होणार आहेत. तसेच ठराव क्र.५ दिनांक ०३/०४/१९७० हा निलंबन / विखंडन केल्यामुळे त्याद्वारे देण्यात येत असलेली ४०% सवलत देखील पूर्वलक्षी प्रभावाने वसूल करावी लागणार आहे.

**वरील सर्व बाबी विचारात घेवून-**

१) पुणे महानगरपालिके तर्फे मा. मुख्य सभा ठराव क्रमांक ५ दिनांक ०३/०४/१९७० नुसार करपात्र रक्कम ठरविताना १०% ऐवजी १५% सूट व ६०% वाजवी भाडे धरण्यात येत असून, त्यासाठी विहित कार्यवाही पूर्ण केलेली आहे. केवळ कायद्यामध्ये सुधारणा झालेली नाही. यामुळे मा. मुख्य सभा ठराव क्र. ११६६, दि. ०१/०३/२०१९ अन्वये १५% ऐवजी १०% ची सवलत दिनांक ०१/०४/२०१९ पासूनच्या नवीन मिळकतींना देण्यात येत आहे. त्यामुळे, सन २०१०-११ पासून ५% वार्षिक करपात्र रक्कमेतील फरक सन २०१०-११ पासून पूर्वलक्षी प्रभावाने वसूल करण्याचा दि.२८/०५/२०१९ चा निर्णय रद्द करण्यात यावा, ही विनंती.

२) मा. मुख्य सभा ठराव क्र.५ दिनांक ०३/०४/१९७० हा ठराव निलंबन / विखंडीत करण्यात येवू नये, कारण सदरचा ठराव निलंबन / विखंडीत झाल्यास, या ठरावानुसार देण्यात येत असलेली ४०% सवलत (इमारतीचे वाजवी भाडे ६०% धरून) हे देखील पूर्वलक्षी प्रभावाने वसूल करण्यासाठी बंद करावी लागणार आहे.

३) सदरच्या दोन्ही सवलती ह्या मा.मुख्य सभेच्या मान्यतेने व शासनाचे नोटीफीकेशन सन १९७० पासून करण्यात येत असल्यामुळे, तत्कालीन मा.महापालिका आयुक्त तसेच म.न.पा. आस्थापनेवरील अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात येऊ नये.

४) तसेच मा.मुख्य सभा ठराव क्र.५, दिनांक ०३/०४/१९७० प्रमाणे दि.०१.०४.२०१९ पासून नव्याने आकारणी होणा-या मिळकतींसाठी वैधानिक वजावट ही (statutory deduction) १५% ऐवजी १०% ने सुरु करण्यात आलेली असून, तत्पूर्वीची थकबाकी वसुली (recovery) “न” करण्यास, तसेच जागा मालक स्वतः रहात असल्यास, वर्षिक भाडे ६०% धरण्यास (४०% सवलत देण्यास) ही कार्यवाही चालू ठेवण्यास मे.राज्य शासनाची मान्यता मिळावी, अशी विनंती करण्यात येत आहे.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :–१३/८/२०१९.

**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**